MHLA050002482019

विशेष दिवाणी दावा क्र. १४/२०१९
सय्यद महेबुब व इतर विरुध्द शिवाजी.

**<u>आदेश नि.क्र. ४५ वर</u>**

वादींनी हा अर्ज दाखल करुन या प्रकरणी त्यांचा पुरावा बंद केल्याचा आदेश रद्द करण्याची मागणी केली आहे.

२. या अर्जावर प्रतीवादीने म्हणणे देऊन अर्जास तीव्र आक्षेप घेऊन खर्च बसवून अर्ज नामंजूर करण्याची मागणी केली आहे.

३. दोंन्ही बाजुच्या वकिलांचा युक्तिवाद ऐकला. वादींच्या वकिलांचे म्हणणे असे की, वादी क्रमांक २ हा दिनांक १६.०२.२०२४ ते १७.०२.२०२४ या काळात आजारी असल्याने न्यायालयात पुरावा देण्यासाठी येउ शकला नाही. त्यामुळे दिनांक १७.०२.२०२४ रोजी वादींचा पुरावा बंद करण्यात आला. वादींनी जाणूनबुजून पुरावा देण्यास टाळाटाळ केलेली नाही. त्यामुळे न्यायाच्या दृष्टीने वादीस पुरावा देण्याची संधी देण्यात यावी. प्रतिवादी तर्फे युक्तीवादासाठी अर्जात लिहिलेले कारण खोटे आहे. वादी हे केवळ कामकाज लांबणीवर टाकण्याचा प्रयत्न करीत आहेत. त्यामुळे, प्रतिवादीस आर्थीक व मानसिक त्रास होत आहे. म्हणून अर्ज नामंजूर करावा.

४. प्रस्तुतचे प्रकरण हे स्थावर मालमत्तेतील पक्षकारांचे हक्क ठरवण्यासाठी दाखल केलेले आहे. दिनांक १७.०२.२०२४ रोजी वादी आजारी असल्याने वादीच्या वकीलांनी निशाणी क्रमांक ४४ वर मुदत मिळण्याचा अर्ज दिला होता. त्यामध्ये वादीचा साक्षीदार आजारी असल्यामुळे हजर राहु शकला नसल्याचे कारण नमुद केले होते. परंतु, वैद्यकीय प्रमाणपत्र दाखल न केल्यामुळे

तो अर्ज नामंजूर करण्यात आला होता. या अर्जासोबत वादींनी डॉ. बी.एम. गादेवार यांचे वैद्यकीय प्रमाणपत्र दाखल केले आहे. त्यानुसार वादी क्रमांक २ तुकाराम साबणे हा दिनांक १६.०२.२०२४ रोजी व दिनांक १७.०२.२०२४ या दिवशी आजारी होता व त्यांच्याकडे उपचार घेत होता असे दिसून येते. त्यामुळे अर्जातील कारण योग्य असल्याचे वादींनी दाखवून दिले आहे. या दाव्याचे स्वरुप पाहता, वादाचा गुणदोषावर निर्णय होण्यासाठी वादींना पुराव्याची संधी देणे न्यायोचित होणार आहे. म्हणून सदरचा अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. म्हणून मी खालील आदेश देतो.

## आदेश

वादींचा पुरावा बंद केल्याचा दिनांक १७.०२.२.२४ रोजीचा आदेश रद्द केला आहे.

**(प्र. अ. सवदीकर)**

दिनांक ०६/०४/२०२४.

दिवाणी न्यायाधीश व. स्तर, अहमदपुर
जिल्हा लातूर.